# निवडणुकीच्या महा उत्सवासाठी मनपाची संपूर्ण यंत्रणा सज्ज

## दिव्यांगांसाठी व्हिल चेअर, दिव्यांग रथांची सुविधा

**नागपूर.** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर सर्वत्र लोकशाहीचा महाउत्सव शुक्रवार १९ एप्रिल रोजी मोठ्या हर्षोल्हासात  साजरा केला जात आहे, या महा उत्सवासाठी नागपूर महानगरपालिकेची संपूर्ण यात्रांना सज्ज असून, मतदारांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी मनपाची परिवहन सेवा, शाळा, कार्यालय, अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने तत्पर आहेत.

नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हा अधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपिन इटनकर व जिल्हा परिषद नागपूरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व स्वीपच्या नोडल अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा यांच्या मार्गदर्शनात लोकशाहीच्या महाउत्सवात मतदानासाठी येणाऱ्या मतदारांना आणि अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याकरिता सर्व बूथसाठी विशेष दिव्यांग रथांची व्यवस्था करण्यात आली आहे. नागपूर शहरातील सहाही विधानसभा क्षेत्रातून ही सेवा उपलब्ध असणार आहे. याशिवाय निवडणूक प्रक्रियेत तैनात कर्मचाऱ्यांना पोलिंग बूथवर ने-आण करण्यासाठी मनपाच्या परिवहन विभागातर्फे  ३६५ बसेसची सेवा उपलब्ध असणार आहे.  तसेच निवडणूक कार्यात  मनपाच्या विविध विभागाचे एकूण २४०२ अधिकारी व कर्मचारी यांची सेवा अधिग्रहित करण्यात आली आहे. मनपाचे विविध शाळा अध्ययन कक्ष, कार्यालय, इत्यादी 367 इमारती मतदान केंद्राकरीता उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यात रॅम्प, पाणी सुविधा, फर्निचर, लाईट, फॅन, इत्यादी आवश्यक सुविधा, उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, तर मनपातर्फे दिव्यंग व ज्येष्ठ नागरिक मतदारांकरिता मनपा शाळा व कार्यलये येथील मतदान केंद्रावर एकूण ५६ व्हिल चेअर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विविध स्पर्धा देखील आयोजित करण्यात येत आहेत. यात सर्वाधिक मतदान करणा-या सोसायटींना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. नागपूर महानगरपालिका आणि नागपूर जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने सोसायटींसाठी विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका आणि नागपूर जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने शहरातील फ्लॅट, अपार्टमेंट, हाउसिंग सोसायटींसाठी तीन गटात मतदार स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये ५० पर्यंत कुटुंब संख्या असलेल्या सोसायटी, ५० पेक्षा जास्त आणि १०० पेक्षा कमी कुटुंब संख्या असलेल्या सोसायटी आणि १०० पेक्षा जास्त कुटुंब संख्या असलेल्या सोसायटी असे स्पर्धेसाठी तीन गट करण्यात आलेले आहे. प्रत्येक सोसायटीतील मतदार यादीत नाव असलेल्या १८ वर्षांवरील व्यक्तींनी मतदान करणे अनिवार्य आहे. ज्या सोसायटीमधील सर्वाधिक मतदार मतदान करतील त्या सोसायटींना स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये नोंदणी करण्यासाठी मनपा आणि जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत गुगल लिंक व क्यूआर कोड तयार करण्यात आले आहे. यावर नोंदणी करताना अडचण निर्माण झाल्यास sveepngp2024@gmail.com या ई-मेल आयडीवर अडचण नोंदवावी. स्पर्धेची अंतिम तारीख २१ एप्रिल असून जास्तीत जास्त सोसायटींनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन मनपा व जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.